N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर **P.S.(ठाणे):** बंडगार्डन

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0206 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 02/07/2025 08:05

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगळवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 01/07/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 01/07/2025
**Time From (वेळेपासून):** 16:20 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:20 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 02/07/2025 **Time (वेळ):** 07:55 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 011
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 02/07/2025 07:55 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** तोंडी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** विधान भवन समोर, नवी प्रशासकिय इमारत पुणे चे ,आवारातील चहाचे कँटीनजवळ

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S (पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** [illegible]

**(b) Father's/Husband's Name (वडील / पतीचे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1967

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदार कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | [illegible] अपार्टमेंट ,तनु शाळेजवळ. नवी सांगवी पुणे,बंडगार्डन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | [illegible] न6 [illegible] अपार्टमेंट ,तनु शाळेजवळ, नवी सांगवी पुणे,बंडगार्डन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल क्र.):** 91-9923[illegible]695

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उपनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | योगेश [illegible] | | | 1. मोहननगर पीसीएमसी शाळेजवळ,मुथा बिल्डींग फलट न6,दुसरा मजला चिंचवड , बंडगार्डन,पुणे शहर,महाराष्ट्र, भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणाऱ्याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी.श्री.सुरेश विश्वनाथ शेलार,वय-58 वर्षे व्यवसाय –नोकरी रा.रुम नं.6 साईसुख अपार्टमेंट तन्नु शाळेजवळ नवी सांगवी पुणे मो.नं.9923157695.

समक्ष हजर राहुन जबाब देतो की,"मी वरील प्रमाणे असुन वर नमुद पत्त्यावर माझ्या परीवारासोबत राहण्यास आहे. मी सन जुलै 2022 साली टाटा ए आय जी कंपनीची मेडीक्लेम पोलीस नं.0239326260 घेतली होती.माझा सन डीसें 2022 मध्ये ॲक्सीडेंट झाल्याने मी ज्युपीटर हॉस्पीटल बाणेर येथे सन दि. 13/01/2023 रोजी ॲडमीट होऊन औषधोपचार घेत असताना माझे हॉस्पीटलच्या बिलाची रक्कम मी घेतलेल्या टाटा ए आय जी मेडीक्लेम पॉलीसीने माझी ॲंजीओप्लास्टी झाली असल्याचे कारण देऊन कंपनीने हॉस्पीटल बीलाची रक्कम देण्यास नकार दिला त्यामुळे हॉस्पीटल चे संपुर्ण बील मी स्वत: भरले होते.त्यानंतर मी सदर बाबत ग्राहक न्यायालयात केस नं.C.C/23/2023 दि.16/03/2023 प्रमाणे दाखल केली आहे.या केस मध्ये अनेक तारखा होऊन सुनावणी झाली आहे.परंतु मागील काही तारखांपासुन माझ्या केसची फाईल सापडत नाही असे कोर्टात संबंधित क्लार्क यांनी सांगितले होते.त्याबाबत मी संबंधीत क्लार्क योगेश यांना दि.20/06/2025 रोजी समक्ष भेटलो असता त्यांनी तुमची फाईल शोधुन पटलावर ठेवतो त्या बद्दल मला रु.2,000/- दयावे लागतील असे सांगितले आहे.तरी क्लार्क योगेश यांनी मागणी केलेली रु.2000/- ही लाच रक्कम असुन ती देण्याची माझी इच्छा नाही. त्यांच्यात व माझ्यात कोणताही आर्थिक व्यवहार नाही.त्यांचेवर कारवाई व्हावी ही विनंती."अशी तक्रार मी दि. 26/06/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे पोलीस उप अधिक्षक,श्री.गावडे यांना दिली होती. त्यांनी त्यांचे दालनात पोलीस निरीक्षक निंबाळकर,लाप्रवि पुणे यांना बोलावुन सदर तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कायदेशिर कारवाई करणेबाबत निर्देश दिले होते.त्यानुसार प्रशासकिय अधिकारी, गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ पुणे यांचेकडील .श्री.वैभव बंडु नरुले वय-35 वर्षे व्यवसाय नोकरी पद- स्थापत्य अभियांत्रीकी सहायक पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ पुणे.-01 रा.विनीयार्ट चर्च जवळ श्री.रेसीडन्सी फलॅट नं.5 जी विंग गणेश नगर दापोडी पुणे-12 व .श्री. वैभव भानुदास लाड,वय- 41 वर्षे व्यवसाय –नोकरी पद- सहायक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ पुणे घर नं.18 श्री.ओम गंगोत्री सहकारी सोसायटी गुरुद्वार समोर स्टेला मेरीस शाळेच्या मागे वडगाव शेरी पुणे-14 असे दोन पंच दि.26/06/2025 रोजी 14.30 वा उपलब्ध झालेनंतर मी माझी लेखी तक्रार पंचासमक्ष वाचुन दाखवली सदर ची तक्रार माझे हकिकते प्रमाणे बरोबर असल्याची खात्री करुन माझे लेखी तक्रारीवर पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी व पंच साक्षीदार यांनी वाचून त्यावर सहया केल्या.

त्यानुसार दि.26/06/2025 रोजी योगेश क्लार्क यांची माझेकडे लाचेची मागणी आहे अगर कसे याबाबत पडताळणी करणेचे ठरले.त्याकरीता सॅनडीस्क कंपनीचे नवीन सिलबंद मेमरीकार्ड त्यांचे वेस्टनातुन बाहेर काढुन पंचासमक्ष शासकिय व्हॉईस रेकॉर्डर मध्ये टाकले.त्यानंतर माझे व पंच क्र.1 श्री.नरुले यांचे पडताळणी निवेदन घेतले ती वेळ 14.53 वा ची होती. त्यानंतर योगेश क्लार्क, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग ,पुणे यांचेकडे पडताळणीकामी माझेकडे शासकिय व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन शर्ट चे आत सेफटी पिन च्या सहायाने लावुन देऊन शासकिय पंच क्र.1 श्री.नरुले यांचेसह नवीन प्रशासकिय इमारत विधान भवन समोर साधुवासवानी चौक येथे 14.58 वा.पाठवले असता सदर पडताळणी वेळी ,मी व पंच क्र.1 श्री.नरुले असे नवीन प्रशासकिय इमारत,विधान भवन समोर पुणे येथे गेलो सदर ठिकाणाहुन मी माझा मोबाईल क्र. 9923157695 वरुन लोकसेवक योगेश यांचा मोबाईल क्र.9763263242 वर फोन करुन त्यांना नवीन प्रशासकिय इमारतीच्या खाली आलो असुन आवारातील चहाचे कॅंटीन येथे थांबलो असल्याचे सांगितले असता ते थोडया वेळात चहाचे कॅन्टीन येथे आले मी पंचासह योगेश

क्लार्क यांची भेट घेतली असता सदर वेळी आमचे मध्ये माझे कामासंदर्भात चर्चा झाली सदर चर्चेदरम्यान मी त्यांना "किती? असे विचारणा करता त्यांनी "आत्ता दया नंतर दया काही हरकत नाही", "तुमच्या परीन दया मला काय अडचण नाय. तुमच्या परीने करा तुमच माझ बोलण झालेल आहे".त्यावर मी "बर तुमच सांगा काय ते" असे म्हणलो असता त्यांनी "कॅशय का ऑनलाईनय? असे मला विचारले.त्यावर मी "काय तुम्ही ऑनलाईन म्हणला तर ऑनलाईन नाय तर हित एटीएम असल तर लगेच काढतों 02 मिनीटात लगेच काढतो कुठय हित एटीएम हाय का?" असे विचारले असता त्यांनी जवळ असलेले एटीएम दाखवले त्यावर मी त्यांना "सांगा ना किती काढु राव" असे विचारले असता त्यांनी "तुमच्या हिशोबाने दया" असे बोलले. त्यावर मी "तुम्ही सांगितल्या प्रमाणे मी लगेच करतो त्या दिवशी बोलल्याप्रमाणे करतो आं आ किती?" असे बोललो असता त्यावर ते "काढा दोन काढा" असे म्हणाले व नंतर लगेच "दिडच काढा काका दिड,दोन नको" असे बोलले.एटीएम मध्ये बॅलन्स नसलेने पैसे काढता आले नाहीत असे मी त्यांना सांगितले. त्यावर ते मला बोलले की,"मी तुम्हाला एक नंबर देतो त्या नंबरला करा ऑनलाईन करा. त्यावर मी किती टाकु ? असे विचारले असता टाका ओ शंभर एकशे एक रुपये टाकले तरी चालल काही हरकत नाही असे म्हणुन ते निघुन गेले.त्यानंतर मी पैसे ट्रान्सफर न करता पंच श्री.नरुले यांचेसह आपण थांबलेल्या लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय पुणे येथे परत आलो ती वेळ 15.40 वा ची होती. योगेश क्लार्क यांनी मला मंगळवार दि. 01/07/2025 रोजी भेटण्यास बोलावलेने दि.26/06/2025 रोजीची पडताळणी कारवाई स्थगित करण्यात येऊन पुढील कारवाई दि.01/07/2025 रोजी करण्याचे ठरविण्यात आले.सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

योगेश क्लार्क ,जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग यांनी मला मंगळवार दि.01/07/2025 रोजी भेटायला बोलावलेने मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे पोलीस निरीक्षक निंबाळकर यांचे कार्यालयात हजर झालो.त्यानंतर माझे व पंच क्र.01 श्री.नरुले यांचे सापळा निवेदन घेतले ती वेळ 11.47 वा ची होती. त्यानंतर मला पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी सापळा कारवाईकामी जाणेसाठी सांगितले असता मी सांगितले की,सापळा कारवाईस जाणेपुर्वी मी योगेश यांना फोन करतो त्यामुळे सदरचा फोन कॉल व्हॉईस रेकॉर्डरवर ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरवले.त्यानंतर मी माझे मोबाईल वरुन योगेश यांचे मोबाईल वर कॉल केला असता सदर संभाषणा दरम्यान योगेश क्लार्क यांनी मला तीन साड, तीन वाजता या असे सांगितले ती वेळ 11.56 वा ची होती.

पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी लागलीच सापळा कारवाई करण्याचे ठरवुन दोन पंचासमक्ष मला योगेश क्लार्क यांनी लाच मागणी केलेप्रमाणे त्यांना देणेकरीता लाच रक्कम हजर करण्यास सांगितले.त्यावेळी मी माझ्या बचतीमधुन 1,500/- रुपये पोनि निंबाळकर यांचे समक्ष हजर केले.पोनि निंबाळकर यांचे सुचनेनुसार मपोहवा 7901 गोरे यांनी दोन्ही पंच व मला अॅन्थ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिव्याचे उपयोग व गुणधर्म समजावुन सांगितले व मी हजर केलेल्या 500 रुपये दराच्या भारतीय चलनातील 03 नोटांचे नंबर एका कागदावर लिहुन त्या नोटांना अॅन्थ्रासीन पावडर लाऊन सदर नोटा मपोहवा गोरे यांनी माझे पँटचे पुढील बाजुच्या उजव्या खिशात ठेवल्या व पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी योग्य त्या सुचना दिल्या व योगेश क्लार्क यांनी लाच रक्कम स्विकारल्यानंतर डोळयावरील चष्मा काढुन लाच रक्कम स्विकारलेबाबत इशारा करावा असे सांगितले.

त्यानंतर योगेश क्लार्क,ग्राहक तक्रार निवारण आयोग यांनी मागणी केलेली लाच रक्कम देणेकरीता मला शासकिय व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन शर्ट चे आत बनियनला लावुन देऊन शासकिय पंच क्र.1 श्री.नरुले यांचेसह नवीन प्रशासकिय इमारत विधान भवन समोर साधुवासवानी चौक येथे जाणेसाठी 15.10 वा चे सुमारास माझी दुचाकी ड्रिम युगा क्र.एम एच 12 के.के 0961 ने रवाना केले व आमचे पाठोपाठ पोनि निंबाळकर व उर्वरीत सापळा पथक रवाना झाले. नवीन प्रशासकिय इमारत, येथील चहाचे कँटीन जवळ जाऊन मी माझे मोबाईल फोन वरुन योगेश यांच्या मोबाईल फोन वर कॉल करुन त्यांना खाली येणेस सांगितले असता त्यांनी बर असे बोलले व थोडया वेळाने खाली आले. मी पंच क्र.01 नरुले यांचेसह योगेश क्लार्क यांची भेट घेतली असता त्यांनी मला गुगल पे च्या संदर्भात नाय आले तुम्ही चेक केले का तुमच्याकडे असे म्हणाले त्यावर मला काय ते लवकर लक्षात आल नाही असे म्हणालो असता त्यांनी गुगल पे उघडा मी सांगतो असे बोलले.त्यावर मी जाऊ दया असे बोलुन फाईल कशी काय कुठे सापडली आपली असे विचारले असता त्यावर ते फाईल काय कुठ जाती गड्ड्यातच असती असे बोलले दोन तारखांना नव्हती येत्या तारखेला हाय च की. त्यानंतर मी त्यांचेसमोर माझे नेसत्या पँटच्या पुढील बाजुच्या उजव्या खिशातुन 1500/- रुपये लाच रक्कम काढुन त्यांचेपुढे धरुन "हे तुमच मोजून घ्या" असे बोललो असता त्यांनी "मोजून मोजून काय घ्यायचय",जे असेल ते असेल मी काय म्हणत नाय" असे म्हणुन माझ्या हातातील लाच रक्कम त्यांनी उजव्या हाताने स्विकारुन डाव्या हातात घेऊन त्यांचे नेसत्या पँटच्या पुढील बाजुचे डाव्या खिशात ठेवली व त्यानंतर मी लाच स्विकारलेचा पुर्व नियोजित इशारा केला असता पोनि निंबाळकर व पथक तेथे आले व पोनि निंबाळकर यांनी माझेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला ती वेळ 16.20 वा ची होती.

त्यानंतर योगेश क्लार्क यांना पोनि निंबाळकर ला.प्र.वि पुणे यांनी व पथकाने ताब्यात घेतले.त्यांना ताब्यात घेते वेळी सापळा पथकातील मपोहवा गोरे यांनी व्हिडीओ चित्रीकरण चालु केले.योगेश क्लार्क यांना त्यांनी स्विकारलेली लाच रक्कम पंचासमक्ष काढुन देणेस सांगितले असता त्यांनी परीधान केलेल्या पँट चे पुढील बाजुचे डाव्या खिशातुन लाच रक्कम रुपये 1,500/- काढुन दिली.त्यानंतर पोनि निंबाळकर यांनी पंच क्र.02 श्री.लाड यांना योगेश क्लार्क यांनी काढुन दिलेल्या लाच रकमेतील नोटांचे नंबर सापळा पुर्व कारवाई दरम्यानचे नोटांचे नंबर लिहुन दिलेल्या कागदावरील नंबर हे एकच आहेत का याबाबत खात्री करण्यास सांगितले.त्याप्रमाणे पंच क्र.02 श्री. लाड यांनी नोटांचे नंबर त्यांचेकडील कागदावर लिहीलेल्या नंबरशी पडताळुन पाहीले असता ते तंतोतंत जुळुन आले. त्यानंतर कँटीन शेजारी असणा-या गाडया पार्किंग शेड मध्ये कृत्रीम अंधारामध्ये योगेश क्लार्क यांचेकडुन हस्तगत केलेली लाच रक्कम व योगेश क्लार्क यांचे दोन्ही हात तसेच त्यांनी परीधान केलेल्या पँट चे पुढील डाव्या बाजुस असणा-या खिशाचे अल्ट्रा व्हायलेट दिव्याच्या प्रकाशामध्ये दोन्ही पंचासमक्ष तपासणी केली असता योगेश क्लार्क यांचे दोन्ही हातास,पुढील बाजुस ,बोटांच्या पे--यावर, तसेच लाच रकमेवर तसेच परीधान केलेल्या पँटचे पुढील बाजुचे डाव्या खिशास अन्थ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली.सदर वेळी व्हीडीओ चित्रीकरण करण्यात आलेले असुन सदर बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

तरी दि.26/06/2025 रोजी मी दिलेल्या तक्रारीवरुन दि.26/06/2025 रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान योगेश दत्तात्रय चवंडके वरीष्ठ लिपीक जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग,पुणे यांनी माझ्या अपघाताच्या हॉस्पीटल बीलाची रक्कम मी काढलेल्या टाटा ए आय जी विमा कंपनीने नाकारल्याने मी विमा कंपनी विरुध्द ग्राहक न्यायालयात दाखल केलेल्या केस नं.सीसी/23/123 ची फाईल शोधुन ठेवल्याचे सांगुन त्या बदल्यात दिड हजार रुपये लाच मागणी करुन दि.01/07/2025 रोजी पंचासमक्ष 1,500/- रुपये लाच रक्कम स्विकारली म्हणुन माझी श्री.योगेश दत्तात्रय चवंडके,वरीष्ठ लिपीक जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग,पुणे यांचेविरुध्द फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणे प्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून बरोबर आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

Parmeshwar Wasudeo Garkal

**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): 15101000402PV

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):
on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार
डेक्कन पोलीस स्टेशन
पुणे शहर

Signature of Officer in charge,
Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): RAVINDRA MANOHA
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): POBN72854

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| | | | | | | चेचक के दाग: NO |
| 1 | पुरुष | | | | | |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.** (जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)